फोन/Phone : 91-22-6656 5656
फॅक्स/Fax : 91-22-2269 6953
ई-मेल : mbpt@vsnl.com

SAGARMALA
PORT-LED PROSPERITY

# मुंबई पोर्ट ट्रस्ट
# MUMBAI PORT TRUST

सामान्य प्रशासन विभाग
पोर्ट भवन, दूसरा माला
शूरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट
मुंबई - 400 001.

General Administration Department,
Port House, 2nd floor,
S.V. Marg, Ballard Estate,
MUMBAI - 400 001.

## प्रेस नोट

## मुंबई पोर्ट ट्रस्ट मधे मराठी भाषा दिन दिमाखात साजरा

मुंबई पोर्ट ट्रस्ट मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व मराठी भाषा गौरव दिन दिमाखात साजरा झाला.

मराठी भाषा दिना निमित्त आठवडयाच्या सुरवातच मराठी भाषा अभिमान गीत गायनाने झाली. त्याच वेळी 'प्रश्नमंजुषा' स्पर्धे अंतर्गत साहित्य, कला, मनोरंजन, इ. वर आधारित सामान्य ज्ञानाची परीक्षा घेणारे प्रश्न विचारण्यात आले. विजेत्यांना तात्काळ बक्षीस देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे ही स्पर्धा एकाच वेळी 6 ठिकाणी इस्पितळ, आंबेडकर भवन, सम्मेलन कक्ष, जवाहर द्वीप तथा इतर गोदी मधील कार्यालयातून घेण्यात आली. त्या शिवाय उत्स्फूर्त वक्तृत्व, निबंध, कथा-कथन, स्वरचित काव्यवाचन तसेच रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांनी मराठी भाषा दिना निमित्त मराठीचा जागर करण्यात आला.

मराठी भाषा दिनाला प्रमुख पाहूणे म्हणून प्रसिध्द साहित्यिक श्री. प्रविण दवणे लाभले होते, मुंबई पोर्ट ट्रस्ट चे उपाध्यक्ष श्री. यशोधन वनगे साहेबांच्या उपस्थितिमुळे कार्यक्रमात जणु दुग्धशर्करा योग जुळून आला होता. पाहुण्यांचे तथा उपाध्यक्षांचे स्वागत पाच सुवासिनींनी मराठमोळया पध्दतीने औक्षण करुन केले.

मुंबई पोर्ट ट्रस्ट च्या वतीने मनोगत व्यक्त करताना उपाध्यक्ष श्री. यशोधन वनगे यांनी ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेतील सौदर्यस्थळांचा दाखला देत प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतली. मराठी भाषा संवर्धनास सर्वांनी विशेष प्रयत्न करायला हवेत असेही अधोरेखित केले. प्रा. प्रविण दवणे यांनी कुसुमाग्रजांच्या कवितेने सुरुवात करुन ''माझ्या लेखनाची आनंदयात्रा'' या विषयावर आपल्या ओघवत्या शैलीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माणसांशी आपुलकीने संवाद साधताना विषय मिळत गेले आणि लेखनाच्या माध्यमातून सरस्वतीची आराधना होत गेली असेही त्यांनी नमूद केले.

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून प्रसिध्द कवी, कवयत्रींच्या कवितांचे एक भव्य काव्य दालन उभारण्यात आले होते. काव्य दालनाचा आस्वाद घेत समारंभाचा समारोप झाला.

श्या. गो. शेणॉय

(श्या.गो.शेणॉय)
मुख्य जनसंपर्क अधिकारी

दिनांक: 1 मार्च 2017




मुंबई पोर्ट ट्रस्ट
सामान्य प्रशासन विभाग (कल्याण प्रभाग)
२७
फेब्रुवारी